08-03-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 07-03-2025 23:27 Page 1



# मूलप्राप्तीसाठी चिमुकलीचा बळी; गुन्हेगार दाम्पत्याला ६ दिवसांची कोठडी

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ७ :** कसलये तिस्क, उसगाव येथे घडलेल्या हृदयद्रावक बालहत्येप्रकरणी मुख्य आरोपी बाबासाहेब अलाट (५२) आणि पूजा अलाट (३८) या दोघांना जेएमएफसी न्यायालयाने सहा दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. मूल होण्यासाठी या बालिकेचा बळी देण्यात आल्याच्या आरोपाखाली पोलिसांनी त्यांना अटक केली होती. मृत बालिकेचा मृतदेह घराच्या अंगणात पुरण्यात आला होता. जो पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

दरम्यान, गुरुवारी रात्री उसगाव येथे पोलिसांनी पीडित बालिकेचा मृतदेह ताब्यात घेतल्यानंतर परिसरात तणाव निर्माण झाला. संशयित आरोपींनी अंधश्रद्धेतून हत्याकांड केल्याचा संशय व्यक्त होत असल्याने संतप्त स्थानिकांनी आरोपींवर कठोर कारवाईची मागणी केली. स्थानिक नागरिकांनी सांगितले की, मूलप्राप्तीसाठी अशा प्रकारच्या विधींची त्यांनी पूर्वी कधीही माहिती ऐकलेली नव्हती.

या धक्कादायक घटनेमुळे केवळ उसगावच नव्हे, तर संपूर्ण गोवा हादरला आहे. पोलिसांकडून हत्येचे नेमके कारण शोधण्याचा प्रयत्न सुरू असून पीडितेच्या वडिलांना पत्नी आणि कुटुंबाला भेटण्यासाठी उसगावमध्ये बोलावून घेण्यात आले आहे.





कसयले तिस्क येथे राहणाऱ्या संततीहीन दाम्पत्याने एका जादूटोण्याच्या विधीवर विश्वास ठेवून मूल होण्यासाठी एका पाच वर्षीय बालिकेची हत्या केल्याचा आरोप आहे. गुरुवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास मुलीचा मृतदेह शेजाऱ्याच्या अंगणात आढळून आला. पोलिसांनी तत्काळ तपास हाती घेत आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू केली आहे.

बाबासाहेब अलाट आणि पूजा अलाट हे दाम्पत्य मुळचे महाराष्ट्रातील मिरज येथील असून ते सध्या उसगावमध्ये वास्तव्यास होते. त्यांनी पीडितेचे अपहरण करून तिची हत्या केल्यानंतर तिचा मृतदेह पुरल्याचा आरोप आहे.

पोलिस उपअधीक्षक (डीवायएसपी) शिवराम वाजगणकर यांच्या माहितीनुसार, बुधवारी संध्याकाळी दोन आणि पाच वर्षांच्या दोन मुलींची आई आपल्या मोठ्या मुलीचा अचानक बेपत्ता झाल्याचा शोध घेत होती. घटनेची तक्रार मिळताच पोलिसांनी तत्काळ अपहरणाचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. सुरुवातीला आरोपींनी स्थानिकांसोबत शोधमोहीमेत सहभाग घेतला. मात्र, दुसऱ्या दिवशी सकाळी त्यांच्या संशयास्पद हालचालींमुळे पोलिसांना त्यांच्या भूमिकेचा संशय आला. चौकशीदरम्यान आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांनी मुलीचे बलिदान दिल्यास पत्नी गर्भवती होईल, अशी अंधश्रद्धा बाळगली होती.

२५ वर्षांपासून विवाहित असलेल्या आणि मूलप्राप्ती न झालेल्या या जोडप्याने एका तथाकथित जादूटोण्याच्या तज्ज्ञाच्या सांगण्यावरून हा प्रकार केल्याचे समोर आले आहे. या अघोरी कृत्यामुळे संपूर्ण राज्यात संतापाची लाट उसळली आहे. उसगाव–गांजेचे सरपंच रामनाथ डांगी यांनी या घटनेचा तीव्र निषेध केला. विज्ञान आणि तर्काच्या युगात अशा अंधश्रद्धांना थारा देता कामा नये, असे त्यांनी स्पष्ट केले.

पीडितेची आई सध्या आपल्या माहेरी राहत असून पतीपासून दूर आहे. घटनेच्या वेळी पीडितेच्या आजीनेच दोन्ही मुलींची काळजी घेतली होती. आरोपी दाम्पत्य पीडितेच्या घरापासून अवघ्या २५ मीटर अंतरावर राहत होते आणि ते बांधकाम क्षेत्रात कामगार आहेत. या घटनेने संपूर्ण गोवा हादरले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. आरोपींवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## निवडक



शिवोरी : श्री शिव साखळेश्वर देवाच्या पालखीत सहभागी भाविक.

### शिव साखळेश्वर देवाचा आज उत्सव

■ टीम दैनिक हेराल्ड

शिवोली, दि. ७ : मायणा – सडये, शिवोली येथील श्री शिव साखळेश्वर देवाचा २७ वा वर्धापनदिन सोहळ्यानिमित्त दोन दिवस भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त शुक्रवार ७ रोजी दुपारी श्रींची पालखीतून मिरवणूक काढण्यात आली. याला मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थितीत लावली. उत्सवाचा मुख्य सोहळा शनिवार दि. ८ रोजी होणार असून सकाळी ९ वाजता गणपती पुजन, देवत प्रार्थना, नवचंडीहवन दुपारी १.३० वाजता आरती व तीर्थप्रसाद व तदनंतर महाप्रसाद पुजेचे मानकरी : श्री. रामकृष्ण कृ. वेर्णेकर रात्री ८.०० वाजता दीपज्योत उत्सव त्यानंतर रात्री १० वाजता ऑर्केस्ट्राने उत्सवाची सांगता होणार आहे .

### जागतिक महिला दिनानिमित्त आज मडगाव रवींद्र भवनमध्ये कार्यक्रम

टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. ७ : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने मडगाव रवींद्र भवनच्या कृष्ण कक्षात शनिवार दि. ८ रोजी दुपारी ३ वाजता एका खास कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सासष्टी महिला संघटना, लायन्स नीव वोयस व रवींद्र भवन यांच्या सहकार्याने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून लायन्स डिस्ट्रिक्ट ३१७ बी चे गव्हर्नर मनोज मनेक, श्रीमती, प्रमुख वक्त्या म्हणून सविता रमेश तवडकर (मुख्याध्यापिका बलराम रेजीडेंशल हायस्कूल) यांची उपस्थिती राहील. समाजात विशेष योगदान दिलेल्या महिलांचा सन्मान या कार्यक्रमात केला जाईल. त्यात स्नेहा सत्पाल चोरगे, डव्होकेट फिलोमेना डिसिल्व्हा, डॉ. प्रमदा उज्वल गावस देसाई, श्रीमती उषा जोगळेकर, रक्षा मनेक. तसेच पत्रकारिता क्षेत्रातील कविता आमोणकर व अनुराधा मोघे यांचा समावेश आहे. सासष्टी महिला संघटनेच्या सतत कार्यरत असलेल्या काही सदस्यांनाही गौरवण्यात येईल. त्यानंतर करमणुकीचे कार्यक्रमात नृत्य, नाट्य, कविता वाचन याचाही समावेश असेल. मोठ्या संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अध्यक्ष रजनी रायकर व लायन्स नीव वोयसच्या स्वाती सुर्लकर, रमा पटवर्धन, गायत्री नातू यांनी केले आहे.

### कुमयामळा – साळ येथे आज ‘व्यंकटेश पद्मावती’

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ७** : कुमयामळा – साळ येथे सालाबाद प्रमाणे शनिवार दि. ८ रोजी श्री राष्ट्रोळी मंदिरात सकाळी ११ वाजता सौ. अनुष्का आणि श्री. अर्जुन गावस या दांपत्याच्या यजमानाखाली सार्वजनिक श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले आहे. तर नंतर दुपारी १ वाजता महाप्रसाद होणार आहे . संध्याकाळी ७ वाजता स्थानिक भजनी कलाकारांचा श्रवणीय भजनाचा कार्यक्रम होईल व रात्री ठीक ११ वाजता कलेश्वर दशावतार नाट्य मंडळ – नेरुर यांचा ट्रिक्स युक्त बहारदार दशावतारी नाट्यप्रयोग व्यंकटेश पद्मावती सादर करण्यात येईल. तरी आपण भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आयोजकातर्फे कळविण्यात आले आहे.



### भिरोणे कुलस्वामी देवस्थानचा आज वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ७ :** खारेबांध भिरोणे येथील श्री कुलस्वामी रामपुरुष देवस्थानचा वर्धापनदिन शनिवार दि. ८ मार्च २०२५ रोजी विविध कार्यक्रमांनी साजरा होणार आहे. यानिमित सकाळी धार्मिक विधी, राजेश शांताराम किनळेकर यांच्या यजमानाखाली श्री सत्यनारायण महापूजा व दु १२ वा. आरती होईल रात्री १० वा. पावणी व त्यानंतर बावळेश्वर दशावतारी नाट्य मंडळ तेंडोली, कुडाळ यांचा 'पंचमुखी हनुमान' दशावतारी नाटक होणार आहे. भाविकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन देवस्थानचे अध्यक्ष महेश देसाई यांनी केले आहे.

## जंगली गव्याच्या वासराची यशस्वी सुटका

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. ७ :** शांतीनगर येथील एका निवासी इमारतीजवळ अडकलेल्या जंगली गव्याच्या वासराची स्थानिक नागरिक आणि वन अधिकाऱ्यांनी यशस्वी सुटका केली. गेल्या काही महिन्यांपासून पोंडा परिसरात जंगली गव्यांचे कळप वारंवार शिरकाव करत असून, फळझाडे आणि वनस्पतींचे नुकसान करत असल्याची स्थानिकांची तक्रार आहे.

काल रात्री शांतीनगर परिसरातील एका कंपाउंड भिंतीजवळ हे वासर अडकले होते. मार्ग न सापडल्याने ते बाहेर पडू शकत नव्हते. स्थानिकांनी तत्काळ वन विभागाला कळवले, ज्यामुळे अधिकाऱ्यांनी घटनास्थळी येऊन सुटकेची प्रक्रिया सुरू केली.

विशेष म्हणजे, वासराच्या सुटकेच्या प्रयत्नादरम्यान त्याची आई आणि एका नर गव्याने संपूर्ण रात्र परिसरात थांबून वासरावर लक्ष ठेवले. अखेर वासराची सुटका होताच दोन्ही प्राणी आपल्या कळपात परत गेले, यामुळे स्थानिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

शहर हद्दीत जंगली प्राण्यांचा वाढता वावर हा चिंतेचा विषय बनला आहे. स्थानिक रहिवाशांनी वन विभागाला जंगलांचे संरक्षण करण्याची मागणी केली आहे. पर्यावरणप्रेमी किशन नाईक यांनी सांगितले की, नुकत्याच झालेल्या रस्ते व गृहनिर्माण प्रकल्पांमुळे जंगल क्षेत्राचे मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाले आहे. यामुळे वन्यप्राणी विस्थापित होत असून, अन्न व पाण्याच्या शोधात शहरात येण्यास भाग पडत आहेत.

जंगल आणि टेकड्या नष्ट होण्यापासून वाचवणे, फळझाडे व वनचरारा रोपण करणे ,आणि वन्यप्राण्यांसाठी जलस्रोत उपलब्ध करण्यासाठी खंदक आणि तळे तयार करणे यासारख्या उपाययोजना राबवण्याचे आवाहन स्थानिक नागरिकांनी वन विभागाला केले आहे यामुळे जंगली प्राण्यांना त्यांच्याच अधिवासात अन्न–पाणी मिळू शकते आणि त्यांचा शहरी भागातील वावर कमी होऊ शकतो, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## सांकवाळचा लढा तीव्र करणार : कॅप्टन विरियातो

■ टीम दैनिक हेराल्ड

**वास्को, दि. ७** : दक्षिण गोव्याचे खासदार कॅप्टन विरियातो फर्नांडिस यांनी बाळी वेळसाव येथील ग्रामस्थांच्या पारंपरिक प्रवेशहक्काच्या लढ्याला पाठिंबा दर्शवला असून, स्थानिकांना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर प्रवेश करण्यासाठी 'पास' घेण्यास भाग पाडणाऱ्या खाजगी बांधकाम व्यावसायिकाच्या कारवाईचा त्यांनी तीव्र निषेध नोंदवला आहे.

आपल्या दौऱ्यादरम्यान, कॅप्टन फर्नांडिस यांनी माजी सांकवाळ पंचायत सदस्य मारियानो रॉड्रिग्ज, माजी वेळसाव पंचायत सदस्य रोकेझिन्हो डिसोझा आणि इतर स्थानिकांशी चर्चा केली. स्थानिकांनी झुआरीनगर येथे खाजगी बांधकाम कंपनीने उभारलेल्या कुंपणाविषयी चिंता व्यक्त केली, कारण यामुळे गावकऱ्यांच्या पारंपरिक मार्गावर बंधने येत आहेत. विशेषतः, या मार्गावर स्मशानभूमी तसेच ऐतिहासिक पवित्र क्रॉस असलेली जागा आहे, ज्यामुळे स्थानिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

कॅप्टन फर्नांडिस यांनी सद्यस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, २०१८ पासून झोनिंग प्लॅनमध्ये झालेल्या बदलांवर टीका केली. त्यांनी सांगितले की, हे प्रकरण नवीन नाही. आम्ही पूर्वीही आऊटलाइन डेव्हलपमेंट प्लॅन आणि प्रादेशिक योजनेत फेरफार होताना पाहिले आहे. नॉन–डेव्हलपमेंट झोनला वसाहती क्षेत्रात रूपांतरित केले जात आहे, ज्यामुळे गोव्याची शेतजमीन, फळबागा आणि टेकड्या नष्ट होत आहेत. या लढ्यात सर्वांनी एकजूट राहण्याची गरज आहे. ही केवळ काँग्रेस किंवा कोणत्याही पक्षाची बाब नाही, तर गोव्याच्या भविष्यासाठीचा संघर्ष आहे. जर आपण आता कारवाई केली नाही, तर भविष्यातील पिढ्या आपल्याला जबाबदार धरणार आहेत.

गावकऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या जमिनीवर प्रवेश मिळावा यासाठी 'पास' आवश्यक असल्याच्या निर्णयावर नाराजी व्यक्त करताना, कॅप्टन फर्नांडिस म्हणाले, हा गोव्यातील स्थानिकांवरील अन्याय असून, हा अपमान सहन केला जाणार नाही. बाहेरील लोक आता आम्हाला आमच्या स्वतःच्या गावात जाण्यासाठी पास घ्यायला सांगत आहेत. दुर्दैवाने, काही गोव्यातील लोक स्वतःला बांधकाम व्यावसायिकांना विकून टाकत आहेत. मात्र, आता हा शोषणाचा अंत करण्याची वेळ आली आहे. ही लढाई वेळसाव येथून सुरू होईल.

कॅप्टन फर्नांडिस यांनी स्थानिकांशी सल्लामसलत न करता कोमुनिदादची जमीन खाजगी कंपन्यांना कशी विकली गेली, याची चौकशी करण्याची मागणी केली. अनियंत्रित जमिनीच्या विक्रीमुळे भविष्यात पाणी आणि वीज पुरवठ्यावर गंभीर परिणाम होईल तसेच स्थानिक रहिवाशांच्या मुक्त हालचालींवर मर्यादा येतील, असा इशाराही त्यांनी दिला.

सांकवाळ कोमुनिदाद जमिनीबाबत बोलताना, कॅप्टन फर्नांडिस यांनी ग्वाल्हेर बिर्ला यांना औद्योगिक कारणांसाठी दिलेली जमीन नंतर झुआरी ॲग्रो केमिकल्स लिमिटेड आणि आता पॅरादीप फॉस्फेट्स यांना हस्तांतरित झाल्याची बाब अधोरेखित केली. त्यांनी आरोप केला की, यापूर्वीच्या कोमुनिदाद व्यवस्थापन समितीने न्यायालयीन लढाईत निष्क्रियता दाखवली, ज्यामुळे ही स्थिती उद्भवली. मात्र, जयेश फडते यांच्या नेतृत्वाखालील नवीन समिती हा मुद्दा पुन्हा उचलून धरत आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

माजी पंचायत सदस्य मारियानो रॉड्रिग्ज यांनी पारंपरिक प्रवेश रोखल्यामुळे स्थानिकांना होणाऱ्या अडचणींवर प्रकाश टाकला. गावातील हिंदू बांधवांना स्मशानभूमी गाठणे कठीण झाले आहे. परिणामी, त्यांना गेल्या काही महिन्यांत सहा वेळा पर्यायी स्मशानभूमीचा वापर करावा लागला आहे. आम्ही गावकऱ्यांसोबत जमिनीच्या संरक्षणासाठी आणि आमच्या हक्कांसाठी लढा देऊ, असा ठाम निर्धार त्यांनी व्यक्त केला.

## उसगाव प्रकरणातील त्या भोंदू बाबांना अटक करण्याची मागणी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. ७ :** गोव्यात वास्तव्यास असणाऱ्या परप्रांतीय लोकांच्या कृत्यामुळे गोव्याचे नाव बदनाम होत असल्याची चीड आहे,त्यापेक्षा ज्या भोंदू बाबांनी हा सल्ला दिला होता, त्या बाबास अटक करून त्याची थेट तुरुंगात रवानगी करण्याची मागणी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांनी दिल्या आहेत.

गोव्यात नरबळीचा हा प्रकार म्हणजे शरमेची बाब आहे. मूल होत नसल्यास, दुसऱ्याच्या मुलाचा बळी घेऊन स्वतःच्या पोटी मूल जन्मास येईल, या गोष्टी मनात येणे म्हणजे हिणकस असल्याचे नागरिक गंगाराम मांद्रेकर यांनी व्यक्त केले. विज्ञान युगात माणूस चंद्रावर जाऊन आला. तरी लोक अश्या थोतांड गोष्टीवर विश्वास ठेवतात व त्यासाठी दुसऱ्याचे मूल आमिष दाखवून बोलावून घेतात व घरातच हत्या केली जाते व अर्धवट पुरून टाकले जाते व 'तो मी नव्हेच' पवित्रा म्हणजे कोल्ड ब्लडेड मर्डर असून त्याच्या दुःखात सामील होणे ह्याचे आश्चर्य वाटले.त्यामुळे अश्या भोंदू बाबांना त्वरित अटक करून थेट तुरुंगात रवानगी करण्याची मागणी मांद्रेकर यांनी केली आहे.

गोवा शांत प्रदेश व साक्षरतेचे प्रमाण सर्वाधिक असल्याने नरबळी वगैरे घटना घडणार नाहीत.परंतु मूलबाळ नसलेल्या दाम्पत्यांना भलतेच सांगून फशी पाडणे अधर्मी कृत्य असून अश्या भोंदू बाबांना आजन्म कारावास शिक्षा देणे योग्य ठरेल.भोंदू बाबाची चलती अनेक भागात चालू आहे व त्यावर आळा घालण्याची नितांत गरज आहे.अन्यथा अश्या घटनांमुळे प्रदेशाचे नाव बदनाम होईल ते रोखण्याची जबाबदारी शासनाने स्वीकारली पाहिजे,असे मांद्रेकर यानी व्यक्त केले.

स्वतःच्या हव्यासापायी शेजारच्या मुलींचा खून करून स्वतःच्या घरात अर्धवट पुरून टाकणे निर्दयीपण असून कठोर कारवाई करण्यापूर्वी त्या भोंदू बाबाला कोठडीत रवानगी करण्याची मागणी मांद्रेकर यानी केली आहे.अंधश्रद्धा निर्मूलन करण्यासाठी अनेकदा शासकीय व नीम शासकीय स्तरावर प्रयत्न चालू आहेत.मात्र काही कुटुंबे अश्या आशेमुळे उद्ध्वस्त होत असतात,त्याचे उत्कृष्ठ उदाहरण असल्याचे मांद्रेकर यानी सांगितले. तरी सरकारने याबाबतीत कारवाई करून कठोर सजा केली पाहिजे तसेच पुन्हा अश्या भानगडी करण्याचे कोणीही धाडस करणार नाही,अशी मागणी होत आहे.

## कृषी सेतू पुलाच्या वापराबाबत शेतकरी संभ्रमात

■ टीम दैनिक हेराल्ड

**कुंभारजुवे, दि. ७** : येथील गौन्डाळी भागातील ३० हेक्टर भातशेतीसाठी शेतीसंबंधित उपकरणे वाहून नेण्यासाठी बांधण्यात आलेल्या कृषी सेतू पुलाचा उपयोग अद्याप अपेक्षित पातळीवर होत नसल्याने स्थानिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. फेब्रुवारी २०२४ मध्ये उद्घाटन करण्यात आलेल्या या पुलाचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांना कितपत होतो, याबाबत अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत.




या पुलाच्या उभारणीमागे मुख्य उद्देश शेतीला चालना देण्याचा होता. मात्र, एक वर्ष उलटल्यानंतरही पूल परिसरातील बहुतांश जमीन लागवडीखाली आलेली नाही. परिणामी, हा प्रकल्प शेतीच्या नावाखाली रिअल इस्टेट विकासाच्या दृष्टीने राबवण्यात आला असल्याची शक्यता काही स्थानिक व्यक्त करत आहेत.

पूर्वी शेती होत नव्हती, आता पूल बांधला गेला तरीही परिस्थितीत फारसा फरक पडलेला नाही. आता मात्र पुलाकडे जाण्यासाठी नदीकाठी रस्ता बांधण्याच्या चर्चा सुरू आहेत, त्यामुळे सरकारचा खरा हेतू काय आहे, याबाबत शंका निर्माण झाली आहे, अशी भावना स्थानिक रहिवासी प्रवीण नाईक यांनी व्यक्त केली.

कुंभारजुआ सरपंच सचिन गावडे यांनी मात्र शेतकऱ्यांच्याच भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या भागातील शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीसाठी पूल मागितला होता आणि सरकारने तो बांधून दिला. मग आता त्याचा वापर का केला जात नाही, हे शेतकऱ्यांनीच स्पष्ट करावे, असे गावडे यांनी सांगितले.

पूल बांधण्याआधी शेतीसाठी आवश्यक यंत्रसामग्री वाहून नेण्यासाठी नदी नेव्हिगेशन विभागाकडून विशेष फेरी सेवा घ्यावी लागत असे, हे टाळण्यासाठी कृषी सेतू उभारण्यात आला. मात्र, पूल पूर्णत्वास आल्यानंतरही शेती न झाल्यामुळे या प्रकल्पाच्या उद्देशावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.स्थानिकांच्या मते, पुलावर जाण्यासाठी अद्याप नीटसं रस्त्याचं बांधकाम करण्यात आलेले नाही. शिवाय, पुलावर जाण्याचा मार्ग बंद करण्यासाठी कुलूपबंद दरवाजा लावण्यात आल्याचे दिसून येते. नदी ओलांडल्यानंतर पूल थेट खुल्या शेतात उघडतो, मात्र या जमिनी लागवडीसाठी कितपत योग्य आहेत, यावर स्थानिकांमध्ये मतभेद आहेत.हा प्रकल्प हाती घेतलेल्या गोवा राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळाचे अध्यक्ष हरीश अडकोणकर यांनी पुलाच्या उद्देशावर किंवा त्याच्या भविष्यातील उपयोगावर कोणतेही भाष्य करण्यास नकार दिला. जीएसआयडीसीच्या अधिकृत माहितीनुसार, ५० मीटर लांबीच्या या सिंगल स्पॅन कमानी पुलाचे काम ४ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू झाले आणि २४ फेब्रुवारी २०२४ रोजी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्या हस्ते त्याचे उद्घाटन करण्यात आले.

आमचे काम केवळ पूल बांधण्याचे होते. तो कशा पद्धतीने वापरण्यात येतो, याबाबत आम्ही उत्तरदायी नाही, असे अडकोणकर यांनी स्पष्ट केले.सरपंच गावडे यांनी या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करण्याचे आश्वासन दिले. मी स्वतः शेतकऱ्यांशी चर्चा करून शेतीसंबंधी अडचणी जाणून घेईन. पूल वापरात का नाही, हे स्पष्ट करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले. मात्र, पुलाचे उद्घाटन पावसाळ्याच्या बराच आधी करण्यात आले होते, हे लक्षात आणून दिले असता त्यांनी अधिक भाष्य करण्याचे टाळले.




**आमोणे : बलराम निवासी विद्यालय व श्रम–धाम संकल्पनेतून बांधण्यात आलेल्या घराला भेटी प्रसंगी मध्यप्रदेशचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय राज्यमंत्री लखन पटेल. बाजूला सभापती तवडकर, सविता तवडकर, हेमंत नाईक गावकर व इतर.**

## मध्यप्रदेशच्या राजमंत्र्यांनी दिली श्रम–धाम संकल्पनेतून बांधलेल्या घरांना भेट

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. ७ :** मध्यप्रदेश राज्याचे पशुसंवर्धन व दुग्ध व्यवसाय राज्यमंत्री लखन पटेल यांनी आमोणे येथील बलराम निवासी विद्यालय व श्रम–धाम संकल्पनेतून गरजूंना बांधून दिलेल्या काही घरांना आज रोजी, भेट देऊन पाहणी केली.

यावेळी सभापती रमेश तवडकर, पैंगीणच्या सरपंचा सविता तवडकर, काणकोण पालिकेचे नगरसेवक हेमंत नाईक गावकर, स्थानिक पंचसदस्य महेश नाईक व अन्य उपस्थित होते.

बलराम निवासी विद्यालयातील सुसज्ज प्रयोगशाळा, स्मार्ट वर्गखोल्या, ग्रंथालय, प्रशस्त क्रीडा मैदान आणि वसतीगृह सुविधा तसेच अन्य पायाभूत सुविधा तसेच शिक्षण आणि सामुदायिक विकासातील परिवर्तनकारी प्रयत्नानी प्रभावीत होऊन मंत्री श्री पटेल यांनी या उपक्रमाचे कौतुक करून पुढील यशासाठी सभापती तवडकर याना शुभेच्छा दिल्या.